राज्यातील नद्यांलगत निळी पूररेषा (Blue Line) आणि लाल पूररेषा (Red Line) चे आवश्यकतेनुसार नव्याने पुर्नसर्वेक्षण करणे, पूररेषा बाधित क्षेत्रातील अधिकृत इमारतींचा सुनियोजित पुर्नविकास करणे, पूररेषा बाधित क्षेत्रातील जुन्या सोसायटींच्या पुर्नविकास प्रस्तावांमध्ये टि.डी.आर सहीत बांधकाम परवानगी मिळण्या कामी तातडीची उपाययोजना व कार्यवाही करणे तसेच सदर विषयी सर्व समावेशक विकास नियंत्रण नियमावली तयार करण्याकरिता समिती स्थापन करण्याबाबत....

# महाराष्ट्र शासन
## नगर विकास विभाग
**शासन निर्णय क्र. टिपीएस-१८२५/२०४/प्र.क्र.५७/२०२५/नवि-१३**

मुख्य इमारत, ४ था मजला, मादाम कामा मार्ग
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
**दि :१०.०२.२०२६**

## आदेश

विषयांकित प्रकरणी सन – २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनामध्ये मा.श्री.शंकर पांडुरंग जगताप (वि.स.स.) यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र.१९४६ उपस्थित केली आहे.

सदर लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने विधानसभेत झालेल्या चर्चेनुसार मा.वि.स.स यांनी विचारलेल्या प्रश्नांना मा.मंत्री, नगर विकास यांचेवतीने मा.मंत्री उद्योग, मराठी भाषा तथा विधी मंडळ कामकाज मंत्री- नगर विकास महोदयांनी विधानसभेमध्ये आश्वासन दिलेले असून विधानसभेतील उक्त लक्षवेधी सूचनेशी संबंधित आश्वासनाची पूर्तता होण्याच्या दृष्टीकोनातून सदर विषयी तज्ञ समिती गठीत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

**०२. शासन निर्णय :-**

राज्यातील नद्यांलगत निळी पूररेषा (Blue Line) आणि लाल पूररेषा (Red Line) चे आवश्यकतेनुसार नव्याने पुर्नसर्वेक्षण करणे, पूररेषा बाधित क्षेत्रातील अधिकृत इमारतींचा सुनियोजित पुर्नविकास करणे, पूररेषा बाधित क्षेत्रातील जुन्या सोसायटींच्या पुर्नविकास प्रस्तावांमध्ये टि.डी.आर सहीत बांधकाम परवानगी मिळण्या कामी तातडीची उपाययोजना व कार्यवाही करणे तसेच सदर विषयी सर्व समावेशक विकास नियंत्रण नियमावली तयार करण्याकरिता खालील प्रमाणे तज्ञ समिती गठीत करण्यात येत आहे.

नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई -32.

| | | |
|---|---|---|
| १. | अपर मुख्य सचिव - नगर विकास विभाग (नवि-१) | अध्यक्ष |
| २. | अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव – जलसंपदा विभाग | सदस्य |
| ३. | अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव – पर्यावरण विभाग | सदस्य |
| ४. | अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव – मदत व पुनर्वसन विभाग | सदस्य |
| ५. | श्री.संजीव टाटू – (महासंचालक, मेरी नाशिक संकलन प्रशिक्षण जलविज्ञान संशोधन व सुरक्षितता) | सदस्य |
| ६. | संचालक, नगर रचना महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य सचिव |
| ७. | आयुक्त, पिंपरी – चिंचवड महानगरपालिका | सदस्य |
| ८. | आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका | सदस्य |
| ९. | आयुक्त, चंद्रपूर महानगरपालिका | सदस्य |
| १०. | सह संचालक, नगर रचना पुणे विभाग, पुणे | सदस्य |
| ११. | मुख्याधिकारी, महाड नगरपरिषद, महाड, जि.रायगड | सदस्य |
| १२. | मुख्याधिकारी, बदलापूर नगरपरिषद, बदलापूर, जि.ठाणे | सदस्य |

**०३. उपरोक्त गठीत समितीच्या कार्यकक्षा व कालबंध कार्यक्रम खालीलप्रमाणे राहील :-**

I. उक्त समितीने राज्यातील ज्या शहरांमध्ये ब्लू लाईन आणि रेड लाईन हा विषय प्रकर्षाने अडचणीचा ठरतोय अशा प्रकरणांमध्ये निळी पूररेषा (Blue Line) आणि लाल पूररेषा (Red Line) यांचे नव्याने सर्वेक्षण करण्याचे दृष्टीकोनातून तसेच राज्यातील नद्यांना येणाऱ्या पुरामुळे बाधित होणारे क्षेत्र व सदर पुरामुळे होणार वित्त व जिवितहानी याबाबत देखील अभ्यास करुन सदर मुद्यांवर शासनास उपाययोजना सुचविणे.

II. उक्त समितीने नद्यांचे लगत जागेवरील परिस्थिती, भविष्यातील विकास तसेच विकासाचा दबाव यासारख्या व इतर अनुषंगीक मुद्दयांचा विचार करुन, नदीपात्रालगतच्या दाटवस्ती, पूर बाधित क्षेत्रातील नागरिक व अधिकृत इमारतीमध्ये राहणाऱ्या रहिवाश्यांकरिता पुर्नविकास प्रस्तावामध्ये व निषिध्द क्षेत्रामध्ये विद्यमान अधिकृत इमारतींचा पुर्नविकास करण्याकामी अशा विद्यमान इमारतींवर अतिरिक्त टि.डी.आर अनुज्ञेय करण्याबाबत विचार होऊन UDCPR नियमावलीमध्ये बदल करणे आवश्यक असल्यास त्याबाबत उक्त समितीने शासनास आवश्यक ते प्रस्तावित बदल व उपाययोजना सुचविणे.

III. उक्त समितीने निषिध्द क्षेत्रामध्ये समाविष्ट होणाऱ्या बांधकामांची संख्या, सदर बांधकामांचा भक्कमपणा (Structural Stability), विद्यमान बांधकामांची जोते पातळी, नदीची वहन क्षमता, प्रवाहाची दिशा तसेच सभोवतालचा विकास इ. तांत्रिक मुद्यांचा विचार करुन त्यानुसार शासनास अभिप्राय सादर करणे.

IV. सदर समितीच्या होणाऱ्या बैठका आयोजित करणे व अनुषंगिक कार्यवाही संचालक, नगर रचना महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी करण्यात यावी.

नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-32. सत्यमेव जयते

V. सदरहु समितीने सदर विषयाचे तज्ञ, शासनाच्या इतर विभागातील तसेच आवश्यकतेनुसार संबंधित नियोजन प्राधिकरणाशी आवश्यक तो समन्वय साधून आवश्यक ती माहिती घेऊन सदर समितीस संबंधितांनी आवश्यक ते सहकार्य करण्यात यावे. तसेच समितीने आवश्यकतेनुसार अशा तज्ञ / माहितीगार व्यक्ती / संस्था यांना बैठकीस बोलावून आवश्यक ती माहिती घेण्यात यावी. व सदर विषयी आवश्यक त्या शिफारशी तयार करुन समितीचा सर्व समावेशक प्रारुप अहवाल २ महिन्यांच्या आत शिफारशीसह शासनाच्या मान्यतेसाठी करण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in (कायदे/ नियम ) या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

*महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.*

(प्रणव कर्पे)
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत :-

१) मा. मुख्यमंत्री महोदय यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास) महोदय यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क) महोदया, यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. राज्यमंत्री (नगर विकास) महोदया यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६) मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७) अपर मुख्य सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) अपर मुख्य सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव जलसंपदा विभाग, नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालय, मुंबई.
१०) अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव -पर्यावरण विभाग नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालय, मुंबई.
११) अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव – मदत व पुनर्वसन विभाग, , मंत्रालय, मुंबई – ३२.
१२) संचालक, नगर रचना तथा सह सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रति :-

१. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.

/-सदर शासन आदेशाची प्रत संचालनालयाच्या स्तरावरुन समितीच्या सर्व सदस्यांना उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. श्री.संजीव टाटू – कार्यकारी संचालक, (महासंचालक, मेरी नाशिक संकलन प्रशिक्षण जलविज्ञान संशोधन व सुरक्षितता – दिंडोरी रोड, सिडीओ कॉलनी, नाशिक – ४०० ०२४)

३. आयुक्त, पिंपरी – चिंचवड महानगरपालिका, पिंपरी.

४. आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

५. आयुक्त, चंद्रपूर महानगरपालिका,चंद्रपूर.

६. सह संचालक, नगर रचना पुणे विभाग, पुणे

७. मुख्याधिकारी, महाड नगरपरिषद, महाड, जि.रायगड.

८. मुख्याधिकारी, बदलापूर नगरपरिषद, बदलापूर, जि.ठाणे.

९. कक्ष अधिकारी (नवि-२९), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

/- सोबतचा शासन निर्णय या विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावा.

१०. कक्ष अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई.

/- सोबतचा शासन निर्णय शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावा.

११. निवड नस्ती, कार्यासन (नवि-१३).

***************************

नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-32. सत्यमेव जयते